N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0632 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**30/06/2026 21:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिंनाक पासून):** 30/06/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 30/06/2026

**Time From (वेळेपासून):** 13:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 30/06/2026 **Time (वेळ):** 21:52 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 030

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/06/2026 21:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, समोरील टोकरतलाव ते नंदुरबार रो,नंदुरबार , 425412

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विकास शिवाजी लोंढे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,नंदुरबार ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार, महाराष्ट्र,425412,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,नंदुरबार ,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार, महाराष्ट्र,425412,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588029368

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जिजाबराव साहेबराव चौधरी | | | 1. प्ल216/3ब,साई विहार कलनी होंडा शोरूमच्या,मागे, जळगांव रोड, भुसावळ,जळगांव ,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत-425412 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ (500 रुपये दराच्या 10 चलनी नोटा ) | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, विकास शिवाजी लोंढे, वय 36 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार. मो.नं. ७५८८०२९३६८
सरकारतर्फे फियादी होवुन फिर्याद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील 10 महिण्यापासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिंनाक 29/06/2026 रोजी तक्रारदार श्री. निंबा रडा पाटील, वय 69 वर्षे, व्यवसाय- शेती रा. शिंदगव्हाण ता. जि.नंदुरबार यांनी सहा.पोउनिरी विलास पाटील नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना संपर्क करुन एक लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्या बाबत माहिती कळवुन लाप्रवि नंदुरबार येथे येवुन समक्ष तक्रार कळवुन कारवाई करण्याबाबत विंनती केली. त्याप्रमाणे आम्ही मुख्याधिकारी, नगर परीषद शहादा यांना 01 पुरुश पंच व अति कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्या, नंदुरबार विभाग यांना 01 पंच मिळणे कामी पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच, सापळा पथकातील अंमलदार सहा. पो.उप निरी/ विलास पाटील , पोना/67 हेमंतकुमार महाले, यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. निंबा रडा पाटील, वय 69 वर्षे, व्यवसाय- शेती रा. शिंदगव्हाण ता. जि.नंदुरबार असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.

आम्ही तक्रारदार निंबा रडा पाटील यांना त्यांचे तक्रारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, " मागिल वर्षी दिंनाक 13/01/2025 रोजी महाराष्ट्र राज्य, खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार यांच्या कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजने अतंर्गत माझी सुन सौ. मनिषा भगवान पाटील हिच्या नावे आमचे मालकीचे शिंदगव्हाण येथील दुकानामध्ये पापड उद्योग व पिठाची गिरणी या गृह उद्योगा करीता 10,00,000/- रुपये कर्ज मिळणे कामी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार या कार्यालयास ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार येथील सुपरवायझर श्री. जे. एस. चैधरी साहेब यांनी षिंदगव्हाण येथे येवुन गृह उद्योगाचे जागेची पाहणी केली व त्यांनी त्याबाबतचा अनुकूल अहवाल सादर केला. सदर वेळी नियमानुसार आम्ही सदर कर्ज रमकेच्या 5 टक्के प्रमाणे अनामत रक्कम म्हणुन 50,000/- रुपये सेंट्रल बॅकेच्या खोंडामळी शाखेत भरले होते. त्यानंतर सदर कर्ज मंजुर होवून दिंनाक 04/03/2025 रोजी 6,65,000/- रुपये व 2,85,000/- रुपये असे एकुण 9,50,000/-रुपये माझी सुन सौ. मनिषा भगवान पाटील रा. शिंदगव्हाण हिच्या सेन्ट्रल बॅंक ऑफ इंडीया, शाखा खोंडामळी येथील बॅंक खात्यात जमा झाले होते. शासन नियमानुसार सदर कर्जास महिलाना 35 टक्के प्रमाणे सबसीडी असुन सदर सबसिडीची रक्कम 3,50,000/-रुपये मिळाले नव्हते, म्हणुन मी मागील 15 दिवसापासुन खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार या कार्यालयातील सुपरवायझर श्री. चौधरी साहेब यांना भेटलो असता, त्यांनी मला सदर कर्जाची सबसिडी मंजुर होण्याकामीचा प्रस्ताव त्यांनी तयार करुन मुंबई येथे हेड ऑफिसला पाठविला आहे व कर्जाची सबसिडी मंजुरीचे काम पुर्ण केले आहे असे मला सांगून त्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन 10/12 हजार रुपये दया, असे म्हणुन माझ्याकडुन लाचेची मागणी केली तरी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विंनती आहे "

उपरोक्त प्रमाणे तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तक्रारदार

निंबा पाटील व पंच क्र. 1, श्री. मिलींद बच्छाव यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोना/ हेमंतकुमार महाले यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तक्रारदार निंबा पाटील यांचे शर्टचे आत बनियनला बांधुन नंदुरबार टोकरतलाव रोडवरील भुमिअभिलेख कार्यालयाजवळील रोडवरुन 17.24 वा. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार येथे लोकसेवक श्री. जे.एस. चौधरी यांची भेट घेणे कामी रवाना केले होते.

तक्रारदार निंबा रडा पाटील व पंच क्र. 1 श्री. मिलींद बच्छाव हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोना/हेमंतकुमार महाले यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता ,त्यांनी सांगितल की, तक्रारदार निंबा रडा पाटील व लोकसेवक श्री. जे.एस. चौधरी यांची भेट झाल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या सुनेचे कर्जाच्या सबसिडी बाबत विचारले असता, लोकसेवक जे.एस. चौधरी यांनी सांगितले की, सांगल हे आता तुम्हाला ते देणे हे ते दया किंवा नको दया काही हरकत, त्यावर तक्रारदार यांनी विचारले की, किती दयायचे, लोकसेवक जे.एस. चौधरी यांनी सांगितले, त्याच्यातुन रुपया काढता नाही येणार तुम्हाला सांगितल होत, दहा बारा हजार रुपये लागतील ... त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की, इतके नाही हो साहेब, त्यावर लोकसेवक जे.एस. चौधरी यांनी सांगितले की, पाचेक हजार देजा, त्यावर तक्रारदार निंबा पाटील यांनी सांगितले की, मी तीन हजार बोललो होतो तुम्हाला त्या दिवशी, त्यावर लोकसेवक जे.एस. चौधरी यांनी सांगितले की, तुम्ही तीन सांगत होते ...मी सांगत होतो तुम्ही ते तुम्ही सांगत होते तीन ..... मीन सांगितल होत साडेतीन च्या तुमच ..... तुमच सहा लाखाच ही गोश्ट होती...... त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की, माझ्याकडे आता पैसे नाही, त्यानंतर लोकसेवक जे.एस. चौधरी यांनी सांगितले की, जेवढे सांगितल तेवढयाच केल ते काय हे कमी करायच ते, त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितले की, तीन हजार भेटतील साहेब, त्यावर लोकसेवक जे.एस.चैधरी यांनी सांगितले की, पाच तरी करुन दया तिन नको दया... माझ ऐका तुम्ही तुमचे.. तुमचे मी काय नुकसान केल का, असे बोलुन 5,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्यास संमती दर्शवून लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली.

यावरून लोकसेवक श्री.जे.एस. चौधरी यांनी तक्रारदार निंबा रडा पाटील यांचेकडे तक्रारदार यांची सुन सौ. मनिषा भगवान पाटील यांना शासनाचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजने अतंर्गत पापड उद्योग व पिठाची गिरणी या गृहउद्योगा करीता मंजुर झालेले 10,00,000/- रुपये कर्जाच्या 35 टक्के सबसीडी मिळणे कामी वरिष्ठ कार्यालयात प्रस्ताव सादर करुन सदर सबसीडी मंजुर केल्याच्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन प्रथम 10 ते 12 हजार रुपये व तडजोडअंती 5,000/- रुपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळा पथकाची खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर ठरल्याप्रमाणे दि. 30/06/2026 रोजी आम्ही तक्रारदार निंबा पाटील यांना लोकसेवक श्री.जे.एस. चौधरी यांचे मागणीप्रमाणे 5,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. तक्रारदार यांनी त्यांचे शेती उत्पन्नातुन बचत केलेले 5000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा हजर केल्या. आमचे सुचनेप्रमाणे पंच क्र. 2, श्री.वाघ यांनी सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पचांनी सहया केल्या. त्यानंतर पोहवा/ देवराम गावीत यांनी सदर लाचेच्या नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांचे पॅन्टच्या डाव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार निंबा पाटील व पंच क्र. 1 श्री. मिलींद बच्छाव यांचेसह लाचेची रक्कम घेवुन येथे लोकसेवक सुपरवायझर श्री. जे.एस. चौधरी यांची भेट घेणे कामी जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, नंदुरबार पाठविण्याचा निणय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोना/ हेमंतकुमार महाले यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तक्रारदार निंबा पाटील यांचे शर्टचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना पंच नं 1 मिलींद बच्छाव याच्या सोबत पायी पायी रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार निंबा पाटील व पंच क्र. 1 मिलींद बच्छाव असे जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार येथील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, कार्यालय येथे पोहचलो. सदर कार्यालयाचे आजु बाजुस काही अंतरावर सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक चौधरी यांनी फोनवर कार्यालयाच्या बाहेर बोलाविल्याने ते व पंच नं 1 असे कार्यालयाचे बाहेर गेले असता त्यांचे मागे जावुन जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाहेर टोकरतलाव ते नंदुरबार रोडवर आम्ही सापळा पथक आजु बाजुस काही अतरावर सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर रोडवर एक इसम तक्रारदार यांना भेटला त्यानंतर तक्रारदार निंबा पाटील यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत 13.45 वा. सापळा पथकास

पूर्वनियोजित इशारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने लोकसेवक श्री. जे.एस. चौधरी यांना पकडुन ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोहवा/ विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या लोकसेवक जे.एस.चैधरी यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव जिजाबराव साहेबराव चौधरी वय 56 वर्षे, व्यवसाय नोकरी, जेष्ठ पर्यवेक्षक, नेमणुक – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, कार्यालय रा. प्लॉट नं 216/3 ब साई विहार कॉलनी, होंडा शोरूमच्या मागे, जळगांव रोड, भुसावळ जि.जळगाव असे सांगितले.

तरी दिंनाक 30/06/2026 रोजी लोकसेवक जिजाबराव साहेबराव चौधरी वय 56 वर्षे, व्यवसाय नोकरी, जेष्ठ पर्यवेक्षक, नेमणुक – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, कार्यालय रा. प्लॉट नं 216/3 ब साई विहार कॉलनी, होंडा शोरूमच्या मागे, जळगांव रोड, भुसावळ जि.जळगाव यांनी तक्रारदार यांची सुन सौ.मनिषा भगवान पाटील यांना शासनाचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजने अतंर्गत पापड उद्योग व पिठाची गिरणी या गृहउद्योगा करीता मंजुर झालेले 10,00,000/- रुपये कर्जाच्या 35 टक्के सबसीडी मिळणे कामी वरिष्ठ कार्यालयात प्रस्ताव सादर करुन सदर सबसीडी मंजुर केल्याच्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन प्रथम 10 ते 12 हजार रुपये व तडजोडअंती 5,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम 5,000/- रूपये लोकसेवक जिजाबराव साहेबराव चौधरी, जेष्ठ पर्यवेक्षक, नेमणुक – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, यांनी दिंनाक 30/06/2026 रोजी 13.45 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 मिलींद बच्छाव यांचेसमक्ष जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार समोरील टोकरतलाव ते नंदुरबार रोडवर तक्रारदार यांच्या कडुन लाचेची रक्कम स्विकारली, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sandip bhatu patil(I (Inspector)) / DGPSBPM8108 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
नंदरबार शहर पो स्टे

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** sandip bhatu patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSBPM8108

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):